R.No. MHAMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ८१

दि.१० मार्च २०२६,वार: मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी SEVA संस्थेला राज्यस्तरीय सन्मान

ठाणे(जिमाका) :- ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरण, बालविवाह संपवण्यासाठी तसेच बाल संरक्षण आणि बाल हक्कांसाठी सातत्याने आणि प्रभावीपणे काम करणाऱ्या सोशल एम्पॉवरमेंट अँड व्हॉलंटरी असोसिएशन (डएत-) या संस्थेला जागतिक महिला दिन २०२६ निमित्त महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून राज्यस्तरीय मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबई येथे आयोजित विशेष समारंभात महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते हा सन्मान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पवार यांनी स्वीकारला.




ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांना स्वावलंबी बनविणे, त्यांना उद्योजकतेची संधी उपलब्ध करून देणे तसेच सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी डएत संस्था अनेक वर्षांपासून सातत्याने कार्य करत आहे. महिलांना प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि विविध उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देत त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडविण्याचे काम संस्थेने केले आहे. याच उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने हा मानाचा पुरस्कार प्रदान केला.

हा सन्मान केवळ एका संस्थेचा नसून ग्रामीण भागातील हजारो महिलांच्या संघर्षाचा, त्यांच्या जिद्दीचा आणि स्वप्नांचा गौरव असल्याची भावना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या यशामागे संस्थेची समर्पित टीम, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पोलीस प्रशासन, सर्व सहकारी संस्था, समर्थक आणि विशेषतः स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महिलांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

या पुरस्कारामुळे महिलांच्या सशक्तीकरणासाठी सुरू असलेल्या कामाला नवी प्रेरणा मिळणार असून, पुढील काळातही ग्रामीण महिलांना स्वावलंबी आणि सक्षम बनविण्यासाठी डएत संस्था अधिक जोमाने कार्य करत राहील, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला, असे सेवा संस्था प्रकल्प समन्वयक वैभव गायकवाड यांनी कळविले आहे.

## लातूर महापालिकेत जातीय-सामाजिक समतोल साधत स्वीकृत नगरसेवकांची निवड


लातूर / प्रतिनिधी :-लातूर यांच्या कोट्यातून स्वीकृत नगरसेवक










शहर महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीमध्ये जातीय आणि सामाजिक समतोल साधण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समाजांना प्रतिनिधित्व देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

स्वीकृत नगरसेवक म्हणून अनुसूचित जाती समाजातील मातंग समाजाचे प्रा. शिवाजीराव जवळगेकर, मराठा समाजाचे व शहर काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, लिंगायत समाजातील प्रा. बसवराज धरणे तसेच मुस्लिम समाजातील अफजल कुरेशी यांना संधी देण्यात आली आहे.

याशिवाय वंचित बहुजन आघाडी पद काँग्रेसचे बाबा पठाण यांना देण्यात आल्याने शहरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

मराठा, लिंगायत, मुस्लिम आणि अनुसूचित जाती अशा विविध समाजांना प्रतिनिधित्व देत सर्वधर्मसमभावाचे राजकारण करण्याचा प्रयत्न झाल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे. मात्र वंचितच्या कोट्यातून काँग्रेसशी संबंधित व्यक्तीला संधी देण्यात आल्याने काही कार्यकर्त्यांमध्ये प्रश्नही उपस्थित होत असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, या निवडीमुळे महानगरपालिकेतील आगामी राजकीय समीकरणे आणि पुढील अडीच वर्षांतील उपमहापौर पदाच्या राजकारणाकडेही लातूरकरांचे लक्ष लागले आहे.

## लातूर जिल्ह्यात १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन

लातूर, : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच लातूर जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये १४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन करण्यात येत आहे. ही २०२६ या वर्षातील पहिली राष्ट्रीय लोकअदालत असून, देशभरातील न्यायालयांमध्ये एकाच दिवशी अशा लोकअदालतींचे आयोजन होत आहे. या लोकअदालतीत प्रलंबित असलेली तडजोडीस पात्र विविध प्रकारची प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

यामध्ये दिवाणी व फौजदारी प्रकरणे, परकाम्य संलेख अधिनियम कलम १३८ अंतर्गत धनादेश अनादरीत (चेक बाऊन्स) प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, दरखास्त प्रकरणे, कामगार/औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे, बँकेशी संबंधित प्रलंबित प्रकरणे तसेच बँक/वित्तीय संस्थांच्या वाद दाखलपूर्व प्रकरणांचा समावेश आहे. राष्ट्रीय लोकअदालत ही एक प्रभावी पर्यायी विवाद निराकरण पद्धत आहे. येथे पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची पूर्ण संधी मिळते आणि दोन्ही पक्षांच्या आपसी संमतीने तडजोड होऊ शकते. अशा तडजोडीमुळे पक्षकारांचा वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होते. तसेच, प्रकरण आपसी संमतीने निकाली निघाल्यास न्यायालयीन शुल्क (कोर्ट फी) परत मिळते, ज्यामुळे आर्थिक भार कमी होतो.

पक्षकार व विधिज्ञ यांनी १४ मार्च २०२६ रोजीच्या राष्ट्रीय लोकअदालतीत मोठ्या प्रमाणात प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढावीत. यामुळे प्रलंबित प्रकरणांचा बोजा कमी होऊन न्याय व्यवस्थेला गती मिळेल. पक्षकारांनी आपली प्रकरणे या लोकअदालतीत ठेवण्यासाठी संबंधित न्यायालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. एन. गिरवलकर यांनी केले आहे.

## भारतीय क्रिकेट संघात संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा उत्कृष्ट मिलाफ - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई: आयसीसी मेन्स टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने मिळविलेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत संघाच्या कामगिरीचे कौतुक केले.

भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत एक अपवाद वगळता सर्व सामने जिंकत वर्चस्व गाजविले. संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा उत्कृष्ट मिलाफ संघात पाहायला मिळाला. या कामगिरीबद्दल भारतीय संघाचे कर्णधार सूर्यकुमार यादव तसेच प्रशिक्षक गौतम गंभीर यासह सर्व संघाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले.

विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव विधानसभा अध्यक्ष अँड. राहुल नार्वेकर यांनी संमत केल्याचे घोषित केले.

विशेष अभिनंदन प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतीय क्रिकेटचा गौरवशाली इतिहास कपिल देव यांच्या नेतृत्वाखालील संघाने १९८३ मध्ये लॉर्ड्स येथे पहिला विश्वचषक जिंकल्यापासून सुरू झाला. त्यानंतर महेंद्रसिंग धोनी यांच्या नेतृत्वाखाली भारताने २००७ मध्ये पहिला टी-२० विश्वचषक आणि २०११ मध्ये एकदिवसीय विश्वचषक जिंकला. आता २०२४ आणि २०२६ मध्ये पुन्हा टी-२० विश्वचषक जिंकून भारताने क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब म्हणजे कर्णधार सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे हे मुंबईचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुंबई आणि महाराष्ट्राने भारतीय क्रिकेटला अनेक महान खेळाडू दिले असून ग्रामीण आणि सामान्य कुटुंबांतील खेळाडू आज आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत, ही आनंदाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आणि भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळ (बीसीसीआय) यांच्या कार्याचाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी गौरव केला. विधानसभेच्या वतीने भारतीय संघाला अभिनंदनाचा प्रस्ताव पाठविण्यात यावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कालच्या अंतिम सामन्यातील या विजयासह भारताने तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकत नवा इतिहास रचला असून तीन वेळा ही स्पर्धा जिंकणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला. तसेच सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकण्याची कामगिरीही भारताने प्रथमच केली असल्याचे त्यांनी नमूद केले.

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियम या जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने २० षटकांत ५ बाद २५५ धावांचा विक्रमी डोंगर उभा केला. टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील हा आजपर्यंतचा सर्वोच्च धावसंख्येचा विक्रम असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. भारतीय गोलंदाजांनी न्यूझीलंडचा डाव १५९ धावांत गुंडाळत शानदार विजय मिळविला असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, फलंदाजांनी या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली. फलंदाज संजू सॅमसन यांनी ४६ चेंडूत ८९ धावा करून संघाला मजबूत सुरुवात दिली. तसेच अभिषेक शर्मा यांनी अवघ्या २१ चेंडूत ५२ धावा करत स्पर्धेतील सर्वात जलद अर्धशतकांपैकी एक नोंदविले. इशान किशन यांनी २५ चेंडूत ५४ धावा करत धडाकेबाज फलंदाजी केली. तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांनीही महत्त्वपूर्ण धावा जोडून संघाची धावसंख्या भक्कम केली. गोलंदाजीत जसप्रित बुमरा यांनी चार बळी घेत निर्णायक कामगिरी केली. संपूर्ण स्पर्धेत सर्वाधिक किफायतशीर गोलंदाज म्हणून त्यांनी संघाच्या विजयात मोठा वाटा उचलला. उपांत्य फेरीत त्यांच्या निर्णायक गोलंदाजीमुळे सामना भारताच्या बाजूने फिरल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच अक्षर पटेल यांनी तीन बळी घेत संघाला महत्त्वाची साथ दिली, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

## लातूर जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठ नवीन सेवार्थ प्रणालीबाबत प्रशिक्षण

लातूर : माहे एप्रिल २०२६ पासून सर्व वेतन देयके केवळ राज्य शासनाच्या नवीन सेवार्थ प्रणालीद्वारेच तयार करून ऑनलाइन पद्धतीने ई-हस्ताक्षरासह ई-देयक कोषागारात सादर करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. या नवीन प्रणालीच्या कार्यान्वयनासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठी १० मार्च २०२६ रोजी विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे प्रशिक्षण १० मार्च २०२६ रोजी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला माळा, डीपीडीसी हॉल, लातूर येथे दोन सत्रांत होणार आहे. सकाळच्या सत्रात सकाळी ११.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत सर्व उपकोषागार कार्यालय स्तरावरील आहरण व संवितरण अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी, तर दुपारच्या सत्रात दुपारी ३.३० ते ५.०० वाजेपर्यंत कोषागार कार्यालय लातूर मुख्यालय स्तरावरील अधिनस्त सर्व आहरण व संवितरण अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षण घेण्यात येईल.

या प्रशिक्षणास सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच वेतन देयक संबंधित लेखा विषयक कामकाज पाहणारे अधिकारी व कर्मचारी यांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. प्रशिक्षण पुन्हा होणार नसल्याने कोणत्याही परिस्थितीत अनुपस्थित राहू नये, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला भा. पाटील यांनी केले आहे.

## संपादकीय...

# अर्थसंकल्पात शेतकऱ्यांचे दोन लाखांपर्यंत कर्जमाफी : दिलासा की नवे आव्हान?

देशाच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा करण्यात आली, तर त्याचे दूरगामी परिणाम काय असतील यावर सध्या चर्चा सुरू झाली आहे. शेती हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याच्या उद्देशाने अशा प्रकारच्या घोषणा केल्या जातात.

भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतकरी अनेक संकटांना तोंड देत शेती करत असतो. पाऊस अनियमित असणे, उत्पादन खर्च वाढणे, बाजारभावातील चढ–उतार आणि नैसर्गिक आपत्ती या सर्व कारणांमुळे अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले जातात. त्यामुळे कर्जमाफी हा शेतकऱ्यांसाठी तात्पुरता दिलासा ठरू शकतो.

दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा ही अनेक लहान व मध्यम शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची ठरू शकते. कारण या गटातील शेतकऱ्यांकडे मोठे भांडवल नसते आणि त्यांना शेतीसाठी बँक किंवा सहकारी संस्थांकडून कर्ज घ्यावे लागते. कर्जमाफीमुळे त्यांच्या आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी होऊ शकतात.

तथापि, कर्जमाफी ही कायमस्वरूपी उपाययोजना नसल्याचेही अनेक अर्थतज्ज्ञ सांगतात. कारण कर्जमाफी केल्यानंतर काही काळाने पुन्हा त्याच समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतीच्या मूलभूत प्रश्नांवरही उपाययोजना करणे आवश्यक आहे.

शेतीतील उत्पादन खर्च सातत्याने वाढत आहे. बियाणे, खते, औषधे, वीज आणि मजुरी या सर्व घटकांमुळे शेतकऱ्यांचा खर्च वाढतो. मात्र त्यानुसार उत्पादनाला हमीभाव मिळत नाही. या परिस्थितीत शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर राहणे कठीण होते.

अर्थसंकल्पामध्ये कर्जमाफीसोबतच शेतीसाठी दीर्घकालीन धोरणांचीही गरज आहे. सिंचन सुविधा वाढवणे, शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे आणि बाजारपेठेची मजबूत व्यवस्था उभारणे या बाबी तितक्याच महत्त्वाच्या आहेत.

शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारभाव मिळणे हे अत्यंत आवश्यक आहे. अनेक वेळा उत्पादन चांगले असूनही बाजारातील घसरणीमुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे हमीभाव धोरण अधिक प्रभावी करणे गरजेचे आहे.

कर्जमाफीमुळे बँकिंग व्यवस्थेवरही काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो. कारण मोठ्या प्रमाणात कर्जमाफी केल्यास आर्थिक संस्थांवर ताण येण्याची शक्यता असते. त्यामुळे सरकारने आर्थिक संतुलन राखत योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

काही वेळा कर्जमाफीचा लाभ सर्व शेतकऱ्यांपर्यंत समान पद्धतीने पोहोचत नाही, अशी टीकाही केली जाते. त्यामुळे कर्जमाफीची अंमलबजावणी पारदर्शक आणि प्रभावी पद्धतीने होणे महत्त्वाचे आहे.

शेती क्षेत्रात टिकाऊ विकास साधण्यासाठी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. केवळ कर्जमाफीवर अवलंबून राहून शेतकऱ्यांच्या समस्या पूर्णपणे सुटणार नाहीत.

शेतकऱ्यांना शेतीसोबत पूरक व्यवसाय करण्यासाठीही प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, प्रक्रिया उद्योग अशा क्षेत्रांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते.

एकंदरीत, दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा शेतकऱ्यांसाठी दिलासादायक असली तरी ती दीर्घकालीन उपाय ठरू शकत नाही. शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस धोरणे आणि प्रभावी अंमलबजावणी यांची गरज आहे.

शेवटी, शेतकरी सक्षम आणि आत्मनिर्भर झाला तरच देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल. त्यामुळे अर्थसंकल्पातील कर्जमाफीसोबतच शेती क्षेत्राच्या मूलभूत समस्यांवरही लक्ष देणे ही काळाची गरज आहे.

# इतिहासाची पुनरावृत्ती, इतिहासावर मात : भारताचा टी–२० विश्वचषक विजय

क्रिकेट हा भारतासाठी केवळ खेळ नाही; तो भावना आहे, ओळख आहे आणि कधी कधी संपूर्ण राष्ट्राच्या आत्मविश्वासाचा आरसाही असतो. जेव्हा भारतीय संघाने टी–२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात विजय मिळवला, तेव्हा तो फक्त एका ट्रॉफीचा विजय नव्हता; तो कोट्यवधी भारतीयांच्या स्वप्नांचा आणि आशेचा विजय होता. जगातील सर्वात लोकप्रिय आणि रोमांचक स्पर्धांपैकी एक असलेल्या आयसीसी टी–२० विश्वचषक २०२६ मध्ये भारताने पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध केली. अंतिम सामन्यातील या विजयाने भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील अनेक गौरवशाली आठवणींना नव्याने उजाळा दिला. हा विजय म्हणजे इतिहासाची पुनरावृत्तीही आहे आणि इतिहासावर मातही आहे. भारतामध्ये क्रिकेट हा केवळ खेळ नाही; तो लोकांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग आहे. गावातील धुळीच्या मैदानात खेळणाऱ्या मुलापासून ते आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये खेळणाऱ्या खेळाडूपर्यंत प्रत्येकाच्या मनात एकच स्वप्न असते, भारतीय जर्सी घालून देशासाठी खेळण्याचे. क्रिकेटचा सामना सुरू झाला की घराघरात टीव्हीसमोर गर्दी होते. चहाच्या टपऱ्या, गावातील चौक, शहरातील कॅफे सगळीकडे एकच चर्चा असते: भारत जिंकणार का? म्हणूनच भारताचा विजय हा केवळ खेळाचा निकाल नसतो; तो सामाजिक उत्सव ठरतो.

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात काही क्षण असे असतात जे केवळ क्रीडा विजय नसतात, तर राष्ट्रीय आत्मविश्वासाचे प्रतीक बनतात. १९८३ मध्ये कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली भारताने जिंकलेला विश्वचषक हा असा पहिला ऐतिहासिक क्षण होता. त्या विजयाने भारतीय क्रिकेटचा चेहरामोहरा बदलून टाकला. त्यानंतर २००७ मध्ये महेंद्रसिंग धोनी यांच्या नेतृत्वाखाली भारताने पहिल्यांदा टी–२० विश्वचषक जिंकत नवे युग सुरू केले. त्या विजयाने भारतीय क्रिकेटला नवा आत्मविश्वास दिला. त्यानंतर २०२४ मध्ये भारतीय संघाचे कर्णधार रोहित शर्मा यांनी स्पर्धेत उत्कृष्ट नेतृत्व दाखवले. क्रिकेटमध्ये कर्णधार हा केवळ खेळाडू नसतो; तो संघाचा मार्गदर्शक असतो. योग्य वेळी गोलंदाजांचा वापर, अचूक क्षेत्ररचना आणि खेळाडूंवर दाखवलेला विश्वास या सर्व गोष्टींनी संघाला निर्णायक क्षणी बळ




दिले. रोहित शर्माच्या नेतृत्वामुळे भारतीय संघामध्ये आत्मविश्वास आणि एकजूट दिसून आली. आज सूर्यकुमार यादव यांच्या नेतृत्वात मिळवलेला दणदणीत विजय हा त्या इतिहासाचीच पुनरावृत्ती आहे. परंतु अधिक परिपक्व आणि अधिक प्रभावी स्वरूपात.

टी–२० क्रिकेटमध्ये फलंदाजीवर अधिक भर दिला जातो; मात्र या अंतिम सामन्यात भारताच्या गोलंदाजांनी विजयाचा पाया रचला. जसप्रीत बुमराह यांची अचूक लाईन–लेंथ, अर्शदीप सिंग यांची स्विंग आणि हार्दीक पांड्या यांची अष्टपैलू कामगिरी यांनी प्रतिस्पर्धी संघाला सतत दबावाखाली ठेवले. क्रिकेटमध्ये असे म्हणतात, फलंदाज सामना जिंकतात; पण गोलंदाज स्पर्धा जिंकून देतात. या विजयातही तेच दिसून आले. अंतिम सामन्यात भारतीय विजयाचा खरा शिल्पकार ठरला तो म्हणजे जसप्रीत बुमराह. त्याच्या अचूक यॉर्कर, वेगवान चेंडू आणि शांत स्वभावामुळे प्रतिस्पर्धी फलंदाजांना धावा करणे कठीण झाले. निर्णायक क्षणी घेतलेली त्याची विकेट भारतासाठी टर्निंग पॉइंट ठरली. त्याच्या शानदार कामगिरीमुळे त्याला मॅन ऑफ द मॅच हा किताब मिळाला. क्रिकेटमध्ये गोलंदाज अनेकदा पडद्यामागील नायक असतात; परंतु या सामन्यात बुमराहचा प्रभाव इतका जबरदस्त होता की त्याच्याशिवाय हा विजय कदाचित शक्य झाला नसता.

या संपूर्ण स्पर्धेत सर्वाधिक प्रभाव टाकणाऱ्या खेळाडूंमध्ये संजू सॅमसन याचे नाव विशेषत्वाने घ्यावे लागेल. आपल्या आक्रमक आणि आकर्षक फलंदाजीने त्याने भारतीय संघाला अनेक सामन्यांत दमदार सुरुवात करून दिली. निर्णायक क्षणी खेळलेल्या त्याच्या खेळींनी संघाला विजयाच्या दिशेने नेले. सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरीमुळे त्याला मॅन ऑफ द टूर्नामेंट हा मानाचा किताब मिळाला. सॅमसनच्या या यशामुळे भारतीय क्रिकेटला एक नवा तारा मिळाल्याची भावना अनेक क्रिकेटप्रेमींनी व्यक्त केली. अंतिम सामन्यात भारताचा सामना न्यूझीलंड या मजबूत संघाशी झाला. न्यूझीलंडचे कर्णधार हे शांत स्वभावाचे आणि रणनीतीत पारंगत नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या संघाने अंतिम सामन्यात जोरदार संघर्ष केला; मात्र भारतीय गोलंदाजीची धार, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण आणि संयम यामुळे शेवटी विजय भारताच्या बाजूने झुकला.

भारतामध्ये क्रिकेटमध्ये मोठा विजय मिळाला की तो राष्ट्रीय उत्सव ठरतो. रस्त्यांवर फटाके फुटतात, लोक एकमेकांना मिठी मारतात आणि संपूर्ण देश आनंदाच्या लाटेत न्हाऊन निघतो. हा आनंद क्षणिक असला तरी तो लोकांच्या मनात नवी ऊर्जा निर्माण करतो. दैनंदिन जीवनातील संघर्ष, आर्थिक अडचणी आणि सामाजिक ताण यांच्या दरम्यान हा विजय लोकांना आशेची नवी किरण देतो. गेल्या काही वर्षांत भारताला अनेक मोठ्या स्पर्धांमध्ये निराशा स्वीकारावी लागली होती. उपांत्य फेरीतील किंवा अंतिम सामन्यातील पराभवांनी चाहत्यांच्या मनात खंत निर्माण झाली होती. परंतु पराभव हा कधी कधी यशाचा पाया ठरतो. त्या अपयशांनी भारतीय संघाला अधिक मजबूत बनवले. आजचा विजय म्हणजे त्या सर्व पराभवांना दिलेले ठोस उत्तर आहे.

भारतीय क्रिकेटच्या यशामागे व्यवस्थेचेही मोठे योगदान आहे. बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया यांनी गेल्या काही वर्षांत क्रिकेटच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. तसेच इंडियन प्रीमियर लीग मुळे भारतीय खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचा अनुभव मिळाला. या स्पर्धेमुळे अनेक तरुण खेळाडूंना मोठ्या मंचावर चमकण्याची संधी मिळाली. भारतीय संघाचा हा विजय लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. गावोगाव क्रिकेट खेळणारी मुले आज हा सामना पाहून मोठी स्वप्ने पाहत असतील. कारण भारतीय क्रिकेटची कहाणी अजून संपलेली नाही; उलट ती दिवसेंदिवस अधिक रोमांचक होत चालली आहे. क्रीडा ही केवळ मनोरंजन नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याचे माध्यम आहे. ती शिस्त, मेहनत आणि संघभावना शिकवते. भारतीय संघाचा हा विजय त्या मूल्यांना अधिक बळ देणारा आहे.

ठशशिरीं हर्ळीिी, वशषशरीं हर्ळीिी या वाक्याचा खरा अर्थ भारताच्या या विजयाने स्पष्ट केला. इतिहासाची पुनरावृत्ती करताना भारतीय संघाने जुन्या अपयशांवर मात करत नव्या इतिहासाची निर्मिती केली. अंतिम सामन्यात जसप्रीत बुमराह याने मॅन ऑफ द मॅच मिळवत विजयाची पायाभरणी केली, तर संपूर्ण स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या संजू सॅमसन ने मॅन ऑफ द टूर्नामेंट मिळवत भारतीय क्रिकेटच्या भविष्याची नवी दिशा दाखवली. भारताचा हा टी–२० विश्वचषक विजय म्हणजे केवळ एका सामन्याचा परिणाम नाही. तो दीर्घकाळाच्या मेहनतीचा, संयमाचा आणि संघभावनेचा परिपाक आहे. या विजयाने भारतीय क्रिकेट पुन्हा एकदा जगाच्या शिखरावर पोहोचले आहे. आज संपूर्ण देश अभिमानाने एकच वाक्य म्हणत आहे, भारत पुन्हा एकदा न्यूझीलंड संघाला धूळ चारत विश्वविजेता ठरला. टी–२० विश्वचषक स्पर्धेत विजय मिळवल्याबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे हार्दिक अभिनंदन!

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# स्वाभिमानाची प्रेरणा देणारे महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज.

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला.संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती–घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी हिमतीने लढा दिला.त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला. त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.परंतु आपल्याच लोकांनी विश्वासघात केला व संभाजी महाराजांच्या स्थानाची माहिती मोगलांना दिली.यात गणोजी शिर्के हे महाराजांचे मेहुणे होते व कान्होजी शिर्के हे दोघेही छत्रपती संभाजी महाराजांचे जवळचे नातेवाईक होते.परंतु वतनाच्या मुद्द्यावरून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा विश्वासघात केला.यालाच म्हणतात घर का भेदी लंका ढाये१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही. त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले. औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही. संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत राहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात–पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य , शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख–समाधान प्राप्त होईल.कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो–बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे व शोषण करीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण–बाण–शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल. कारण याच गडकिल्लयात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# आनंद ग्रामीण विकास व स्वानंद सार्वजनिक वाचनालयात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न



केज/ प्रतिनिधी□आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता. केज जि. बीड व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च २०२ ६ रोजी जागतिक महिला दिन महिला मेळावा, महिला वाचक मेळावा, ग्रंथप्रदर्शन,कविता लेखन व वाचन स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा घेवून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम मयुरी गायकवाड,वेदिका गायकवाड, अनुश्री गायकवाड, वेदिका गायकवाड,श्रावणी पौळ, अक्षरा सौदागर, अंकिता गायकवाड यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजामाता व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले व विविध कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्ष स्थानी अक्षरा सौदागर या होत्या.

सकाळी ९ते ५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन चालले, सकाळी ९ ते १० या वेळात कविता लेखन व वाचन स्पर्धा घेण्यात आल्या. त्यानंतर १० ते १२ या वेळात महिला मेळावा व महिला वाचक मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात वेदिका गायकवाड, मयुरी गायकवाड, श्रावणी पौळ, अनुश्री गायकवाड, वेदिका गायकवाड, अंकिता गायकवाड व दोन्ही संस्थेचे संस्थापक, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य, डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप अक्षरा सौदागर यांनी केला.

कविता लेखन व वाचन स्पर्धेतही अक्षरा सौदागर, वेदिका गायकवाड, मयुरी गायकवाड, श्रावणी पौळ, सोहम गायकवाड, अनुश्री गायकवाड, विक्रम गायकवाड, आनंद गायकवाड, यशवंत सौदागर, बालाजी टिंगरे, समर्थ गायकवाड, आमर पौळ यांनी स्वरचित कविता लेखन व वाचन केले.

त्यानंतर १२ ते २ या वेळात मुलांसाठी क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या.

नंतर ५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन चालले.

५ वाजता बक्षीस वितरणाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# गंगा माऊली शुगर ने केला ५ लाख ५० हजार गाळपाचा टप्पा पूर्ण



केज/प्रतिनिधी.-बीड जिल्ह्यात देखील चांगला साखर कारखाना निर्माण व्हावा व सर्वांना हक्काचा कारखाना वाटावा ही मनोमन असणारी शेतकऱ्यांची इच्छा व गरज लक्षात घेता बीड जिल्ह्याचे सुपुत्र लक्ष्मण मोरे यांनी मागच्या तीन वर्षांपूर्वी गंगा माऊली शुगर सुरू केला आणि शेतकऱ्यांना देखील आशेचा किरण पाहायला मिळाला व आज गंगा माऊली शुगर हा कारखाना शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र झाला असून या गळीत हंगामात ५ लाख ५० हजार ८८ गाळप करून ११ चा उत्कृष्ट साखर गाळप उतारा कारखान्याने स्थापीत केला याबद्दल सर्व ऊस उत्पादक शेतकरी, सभासद व कर्मचारी यांच्यामध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांचा हिताचा कारखाना म्हणून आता गंगा माऊली शुगर या कारखान्याने अल्पावधीत आपली ओळख निर्माण केली आहे केवळ साखरेचे गाळप करून इतर कारखान्याच्या बरोबरीने हा कारखाना उसाला भाव देत असून इतर कोणतेही उत्पादन नसल्याने केवळ आणि केवळ साखर उत्पादनावर हा भाव देणे तसे सोपे नाही मात्र लक्ष्मणराव मोरे यांनी सुरुवातीलाच सांगितले होते की या भागातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरच हसू हाच आमचा नफा असेल आणि अगदी त्याच प्रमाणे शेतकरी वर्ग या कारखान्याच्या बाबतीत आनंदी आहे.

१५ दिवसाला बील देणारा एकमेव कारखाना- या कारखान्याने एक वैशिष्ट्य अगदी पहिल्या गळीत हंगामापासून जपले आहे ते म्हणजे दर १५ दिवसाला शेतकऱ्यांना उसाचे बील दिले आहे. आज देखील २८ फेब्रुवारी पर्यंतचे बील देऊन कारखान्याने शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला आहे.

हा कारखाना शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र रहावा यासाठी लक्ष्मणराव मोरे हे प्रयत्न करत आहेत त्यांचेसोबत या कारखान्याच्या बाबतीत आदित्य पाटील, राहुल सोनवणे, हनुमंत काका मोरे, प्रविण मोरे, अविनाश मोरे यांचेही प्रयत्न मोठे मोलाचे असून यांचेसह कर्मचारी यांनी देखील कारखान्याचे गाळप मोठ्या ताकतीने सर्वांनी मिळून केले व आज रोजी ५ लाख ५० हजार ८८ गाळप करून गंगा माऊली शुगर हे गाळप बंद करत आहे.

# शेतकऱ्यांच्या दोन लाख पर्यंतच्या कर्जमाफीच गोडबंगाल!




शेतकऱ्यांना दोन लाख पर्यंत कर्जमाफी जाहीर केली आणि नेमकी मेक ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले कर्जदार असावे ३० सप्टेंबर पर्यंत किती शेतकरी थकीत आहे तर नेमके चार दोन टक्के जे की मयत असेल किंवा अन्य कारणाने. बरं मयत असणाऱ्या कर्जदाराचा फक्त मृत्यूचा दाखला घेऊन हे कर्ज माफ करणार नाही त्यातही त्याच्या कर्जाची हमी स्वतःवर घेणारा आप्त किंवा वारसाने स्टॅम्प पेपरवर नोटरीद्वारा शपथपत्र करून,अशा वारसाच्या नावे शेती असावी व त्या शेतीवर कर्ज नसावं,बिना कर्जाची फार्मर खऊ हवी. शेतीवर कर्ज नसलेला वारस त्या मयत शेतकऱ्याचा कर्जबोजा स्वतः घेणारा कुठे भेटेल बरं,शेती असणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यावर पीक कर्ज असणारच यात कुणाचंही दुमत नसातांना अशा अटी लादल्या त्यामुळे हे मयत शेतकऱ्याच्या टाळुवरचच लोणी खाण नव्हे का?.असा शेती असून कर्ज नसलेला कोण वारस मयत शेतकऱ्याला मिळेल बरं या वरून मयत थकीत शेतकऱ्यांनाही कर्जमाफी मिळेल याची शाश्वती नाही.

हयात शेतकऱ्याला ३१ मार्च च्या आत काहीही करून गाय बैल शेळ्या मेंढ्या बायकोच्या गळ्यातलं विकून पीक कर्ज भराव लागते तरच पुढील हंगामासाठी कर्ज मिळून त्याची शेती होऊ शकते त्यामुळे ९८/९९ टक्के शेतकरी हे नियमित कर्ज भरणारेच आहे त्यात त्यांना या दोन लाखाच्या कर्जमाफीचा किती लाभ होणार बरं ? खुप तर नियमित कर्जदाराला पन्नास हजाराच अनुदान सरकार देईल,पण दोन लाखाचा मात्र गाजावाज्या ह्या सरकारकडून होणार,कर्जमाफी जाहिरातीवर शेतकऱ्याच्या कर्जमाफीच्या रकमपेक्षाही जास्त खर्च हे करणार! उदधोगपतीच्या अरोबो खरोबो कर्जमाफीची मात्र कुणाला भनक सुद्धा लागू देणार नाही अशाप्रकारे रात्रंदिवस कष्ट उपसून अत्यल्प दरात जनतेची भूक भागवणाऱ्या अशा या शेतकऱ्याच्या कर्जमाफीची हे सरकार थट्टाच करणार हे मात्र नक्की ! सरकारच्या अशा कुटनितिमुळे शेतकऱ्यांनी या कर्जमाफीचा लाभ घेण्यासाठी नियमित कर्जदाराचा थकीत कर्जदार होणंच योग्य राहील अशी शेतकऱ्यात चर्चा दिसून येत आहे.

**रामचंद्र सालेकर-**
**९५२७१३९८७६,चंद्रपूर.**

# डिजिटल युगात सुरक्षित महिला म्हणजे सक्षम समाज



लातूर – आजच्या डिजिटल युगात इंटरनेट, मोबाईल, सोशल मीडिया आणि विविध ऑनलाइन सेवांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. तंत्रज्ञानामुळे जीवन अधिक सोयीस्कर झाले असले तरी सायबर फसवणूक, बनावट लिंक, ओटीपी फसवणूक, फोटो मॉर्फिंग यांसारख्या गुन्ह्यांपासून महिलांनी सावध राहणे अत्यंत गरजेचे आहे. डिजिटल युगात सुरक्षित महिला म्हणजेच सक्षम समाज घडविण्यासाठी सायबर सुरक्षेबाबत जागरूकता आवश्यक असल्याचे प्रतिपादन सायबर सुरक्षा तज्ज्ञ श्री. अशोक भिसे यांनी केले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील महिला कल्याण व तक्रार निवारण समितीच्या वतीने 'सायबर सुरक्षा' या विषयावर आयोजित व्याख्यानात श्री अशोक भिसे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी मुख शल्य तज्ज्ञ प्रा. डॉ. अमोल डोईफोडे, शैक्षणिक प्रभारी डॉ. गौरी उगले, ओरल पॅथॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. वर्षा सांगळे, महिला कल्याण समितीच्या अध्यक्षा डॉ. स्नेहा चोले, संयोजक डॉ. शीतल नागीमे, समिती सदस्या डॉ. प्रियांका मुंडे तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री. सुनील कवटेकर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना श्री. अशोक भिसे म्हणाले की, आज अनेक महिला शिक्षण, व्यवसाय, नोकरी आणि सामाजिक क्षेत्रात ऑनलाइन माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करत आहेत. मात्र या डिजिटल जगात सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियावरील छळ, खोटी प्रोफाइल तयार करणे, फोटोचा गैरवापर अशा अनेक समस्या वाढताना दिसत आहेत. त्यामुळे महिलांनी सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे.

सायबर सुरक्षेसाठी काही साधे पण महत्त्वाचे उपाय त्यांनी सांगितले. सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती जसे की पत्ता, फोन नंबर किंवा बँक तपशील शेअर करू नये. मजबूत आणि वेगळे पासवर्ड वापरावेत तसेच ते कोणासोबतही शेअर करू नयेत. अनोळखी लिंक, ई-मेल किंवा मेसेजवर क्लिक करताना सावधगिरी बाळगावी. कोणत्याही प्रकारचा ऑनलाइन त्रास होत असल्यास त्वरित तक्रार करून कायद्याची मदत घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

भारतामध्ये सायबर गुन्ह्यांविरुद्ध तक्रार करण्यासाठी सायबर क्राईम पोर्टल व हेल्पलाईन उपलब्ध असून महिलांनी भीती न बाळगता अशा घटनांची नोंद करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सायबर फसवणूक कशी होते याचे प्रात्यक्षिकही त्यांनी उपस्थितांना दाखवले. त्यानंतर आयोजित प्रश्नोत्तर सत्रात महिला कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून सायबर सुरक्षेबाबत माहिती घेतली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. स्नेहा चोले यांनी प्रास्ताविक करत आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे महत्त्व स्पष्ट केले व महिलांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागृती करण्याची गरज अधोरेखित केली. तसेच या कार्यक्रमात बी.डी.एस. आंतरवासिता मृणाल कुलकर्णी यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनावर प्रभावी भाषण सादर केले. तसेच तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी हेल्मेट वापराबाबत जनजागृती करणारे लघुनाट्य सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.डी.एस. आंतरवासिता श्रुती इंगळे व वैष्णवी प्रयाग यांनी केले, तर आभार डॉ. शीतल नागीमे यांनी मानले. या कार्यक्रमास एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील महिला अध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लातूर शहर महानगरपालिकेमार्फत गर्भशायमुख कर्करोग प्रतिबंधासाठी एचपीव्ही लसीकरणाचा शुभारंभ



राज्य शासन स्तरावरून प्राप्त मार्गदर्शक सूचनेनुसार महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत एचपीवी लसीकरणाचा शुभारंभ महापौर जयश्री सोनकांबळे, यांच्या हस्ते कार्यक्रमचे उदघाटन करण्यात त्यावेळी आयुक्त मानसी उपायुक्त वसुधा फड वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भरती, यांच्या सह कार्यक्रम अधिकारी डॉ रामेश्वर कलवले , वैद्यकीय अधिकारी डॉ शामा जाधव , डॉ सुनिता कदम, डॉ प्राजक्ता शिंदे यांची उपस्थिती होती.

पात्र लाभार्थी – ज्या मुलींचे वय वर्षे १४ पूर्ण आणि १५ वर्षाच्या आत असेल अशा मुलींना ही लस मोफत दिली जाणार आहे

लस मिळण्याचे ठिकाण

१.नागरी आरोग्य केंद्र इंडिया नगर , काळभैरवनाथ मंदिराजवळ

२. नागरी आरोग्य केंद्र गौतम नगर , खणी भाग

३. नागरी आरोग्य केंद्र प्रकाश नगर

४. नागरी आरोग्य केंद्र मंठाळे नगर

५. नागरी आरोग्य केंद्र तावरजा कॉलनी , बादाडे नगर

६. नागरी आरोग्य केंद्र राजीव नगर मनपा शाळा क्रमांक १६

७. नागरी आरोग्य केंद्र अन्सार नगर, साळे गल्ली

८. नागरी आरोग्य केंद्र बौद्ध नगर यशवंत शाळेच्या मागे नांदेड रोड

या सर्व महानगरपालिकेच्या नागरी आरोग्य केंद्राच्या ठिकाणी मोफत लस दिली जाणार आहे.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की आपल्या मुलींना गर्भाशय मुख कर्करोग या आजारापासून संरक्षण करण्याकरिता एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेचे महापौर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी आवाहन केले आहे.

# १०८ कुंडी भव्य महाविष्णू याग व संगीत रामकथा आणि अखंड हरिनाम सप्ताहास बुधवार पासून प्रारंभ



केज/प्रतिनिधी-केज शहरापासून जवळच असलेल्या बीड रोडवरील श्रीकृष्ण आश्रम भक्तीपरिवार येथे बुधवारपासून १०८ कुंडी भव्य महाविष्णू याग व संगीत रामकथा आणि अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होत आहे तरी

या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने भक्तजनांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीकृष्ण आश्रमाचे संस्थापक ह.भ.प.केशव

महाराज शास्त्री यांनी केले आहे.

या यज्ञ पूजेस जोडीने किंवा एकट्यालाही बसता येईल यज्ञ वेळ दररोज सकाळी ८ ते ११, दिनांक १२ मार्च ते १९ मार्च पर्यंत दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत श्री ह.भ.प. परमपूज्य रामराव महाराज ढोक यांच्या मधुर वाणीतून रामकथा संपन्न होणार आहे. दररोज सायं.८ ते १० वाजेपर्यंत कीर्तन संपन्न होईल. बुधवार दिनांक ११ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत विष्णू महायज्ञास प्रारंभ होईल, गुरुवार रोजी रात्री ह.भ.प.अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे कीर्तन संपन्न, शुक्रवार रोजी ह.भ.प. महादेव महाराज राऊत बीड यांचे कीर्तन संपन्न होईल, शनिवार रोजी ह भ प केशव महाराज उखळीकर यांचे कीर्तन संपन्न होईल, रविवार रोजी ह. भ.प. पुंडलिक महाराज देहूकर यांचे कीर्तन संपन्न होईल, सोमवार रोजी ह. भ .प. अमृताश्रम स्वामी महाराज यांचे कीर्तन संपन्न होईल, मंगळवार रोजी ह.भ.प.संदिपान महाराज हासेगावकर यांचे कीर्तन संपन्न होईल, बुधवार रोजी ह.भ.प. विदर्भ रत्न संजय महाराज पाचेकर यांचे कीर्तन संपन्न होईल, गुरुवार दिनांक १९ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत ह.भ.प.रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे काल्याचे किर्तन संपन्न होईल.

केज तालुक्यासह बीड जिल्ह्यातील व इतर जिल्ह्यातील आणि परिसरातील श्रीकृष्ण भक्तांनी या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन ह. भ .प. भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांनी केले आहे

# ग्रामपंचायत निवडणूक अनुषंगाने होत असलेल्या प्रभाग रचना नियमबाह्य व चुकीची असून ती शासन नियमाप्रमाणे करण्यात यावी-सुरज काळे



केज/प्रतिनिधी□केज तालुक्यातील येवता येथे ग्रामपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या होत असलेल्या प्रभाग रचना नियमबाह्य व चुकीचे असून ती शासन नियमाप्रमाणे करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे केज तहसीलदार यांच्याकडे रिपाईचे तालुका अध्यक्ष दीपक कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सध्या येवता ग्रामपंचायत कार्यालयाचा कार्यकाल संपुष्टात आला असून त्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार केज यांच्या निर्देशानुसार केज तालुक्यातील येवता येथे प्रभाग रचनेचे काम चालू आहे परंतु सदर प्रभाग रचना ही नियमबाह्य व चुकीचे असून ती शासन नियमानुसार करण्यात यावी अशी येवता येथील नागरिकाच्या वतीने केज तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

दिनांक १ मार्च २०२६ रोजी येवता येथील हनुमान मंदिर येथे संबंधित सज्जेचे महसूल अधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांनी गावातील नागरिक व दलित समाजातील प्रतिनिधी राहुल सुंदर काळे यांनी ग्रामपंचायत प्रभाग रचनेबाबत सदर प्रभाव रचनेच्या विस्ताराबाबत विचारणा केले असता संबंधित अधिकारी यांनी सांगितले की, आम्ही प्रभाग निहाय कुटुंब सदस्य. त्यानंतर पुढील बैठकीत प्रभाग रचना निश्चित केली जाईल असे सांगितले. त्याबाबतचा एक व्हिडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध आहे, तसेच झालेल्या बैठकीमध्ये कुटुंब सदस्य संख्या कशी निश्चित केली आहे. त्याबाबत बैठकीत चर्चा झालेली नाही व संबंधित अहवाल पंचनामावर नागरिकांनी सह्या अथवा अंगठे केलेले नाहीत. दिनांक ६ मार्च २०२६ पूर्वीच्या संबंधित अधिकारी यांनी पूर्व माहिती न देता अचानक येवता येथे येऊन प्रभाग रचने संबंधित. संबंधित अधिकाऱ्यांनी सकाळी ११-०० वाजता गावामध्ये येऊन प्रतिनिधींना व नागरिकांना दलित समाजातील मतदारांना विचारात न घेता ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये बैठक चालू करण्यात आली असता संबंधित अधिकारी यांनी सांगितले की, प्रभाग १ व २ यामध्ये कसलाही बदल न करता फक्त प्रभाग क्रमांक ३ व ४ मध्येच बदल केला जाईल असे सांगितले. सदरील प्रभाग रचना संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदारांच्या वास्तव्यास असलेल्या ठिकाणी न जाता गावातील राजकारणी लोकांच्या दबावाला बळी पडून व आर्थिक लालच भावनेच्या हेतूने मनमानी व मोगल पणाचे धोरण राबवून दलित समाजातील व गावातील नागरिकांना व प्रतिनिधींना विचारात न घेता प्रभाग रचनेचा किंवा प्रभाग रचनेचा घाट घातलेला असून त्यांचे हे धोरण दलित समाजाला व गावातील नागरिकाला अन्याय होईल अशा प्रकारे आहे. प्रभाग १ ते ४ हे प्रभाग रचना निवडणूक नियमाप्रमाणे झालेले नसून याबाबत अम्मा येवता येथील सर्व दलित समाजाला व गावातील नागरिकांचा आक्षेप आहे. तरी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार केज यांनी सदर प्रकरणाची तात्काळ दखल घ्यावी. अशी लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. अन्यथा येवता येथील सर्व दलित समाजाच्या व नागरिकांच्या वतीने दिनांक १२ मार्च २०२६ रोजी पासून केज तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल असा प्रशासनाला लेखी निवेदनाद्वारे इशारा दिला आहे.या मागणीचे लेखी निवेदन तहसीलदार राकेश गुडे यांनी स्वीकारले आहे. सदर निवेदनाच्या प्रती या तहसीलदार केज, जिल्हा निवडणूक अधिकारी बीड, निवडणूक आयुक्त छत्रपती संभाजी नगर, राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य मुंबई यांना दिल्या आहेत. या लेखी निवेदनावर सुरज काळे, विनोद गायकवाड, हरीश गायकवाड, राहुल काळे, विक्रम जाधव, रोशन जाधव यांच्यासह ८० नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.






# लखन सोनवणे यांच्या विधी कार्यालयाचे उद्घाटन संपन्न



केज/प्रतिनिधी-केज शहरात ड. लखन विजयराव सोनवणे यांच्या विधी कार्यालयाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून छत्रपती संभाजी नगर येथील उच्च न्यायालय खंडपीठाचे ज्येष्ठ विधीज्ञ ड. निलेशजी घाणेकर व शुभ आशीर्वाद:- ह.भ. प. केशव महाराज शास्त्री तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा डॉ. सौ्.सीताताई बनसोड, प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ.हारुणभाई इनामदार, भाजपचे ज्येष्ठ नेते रमाकांत मुंडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती डॉ. वासुदेव नेहरकर, माजी जि.प. सदस्य विजयकांत मुंडे, माजी पंचायत समिती उपसभापती विष्णू घुले, नगरसेविका पद्मिनी आक्का शिंदे, डॉ.कुटे ,नगरसेवक बाळासाहेब गाढवे, भाजप तालुकाध्यक्ष भगवान केदार, वंचित चे ज्येष्ठ नेते धनराज सोनवणे, वंचित चे ज्येष्ठ नेते रज्जाक सय्यद, रिपाईचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे,मा. न्यायाधीश ड्. प्रशांत गिरी, छत्रपती संभाजी नगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे जेष्ठ विधीज्ञ ड.अशोक केकान, ड. मच्छिंद्र दळवी, युवा नेते राहुल भैया गदळे, जीवाचीवाडीचे माजी सरपंच महादेव चौरे, काशीदवाडीचे माजी सरपंच महादेव जाधव, रिपाई चे ज्येष्ठ नेते दिलीप बनसोड, यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूप-दिपाणी पूजा करून फित कापून विधी कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी ड. लखन विजयराव सोनवणे व सोनवणे परिवाराच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून ड. लखन सोनवणे यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांच्या पुढील व्यवसायासाठी शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ विधीज्ञ श्री सपाटे साहेब यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. या कार्यक्रमाचे उद्घाटक ड.निलेशजी घाणेकर म्हणाले की, ड. लखन सोनवणे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजी नगर येथील उच्च न्यायालय खंडपीठ येथे उत्कृष्टपणे प्रॅक्टिस केलेली आहे. सोनवणे यांचा आमच्या क्षेत्रातील अभ्यास हा परिपूर्ण झालेला असून त्यांना या क्षेत्रातील कामाचा पूर्णपणे अनुभव लाभलेला आहे. केज सह परिसरातील नागरिकांना नक्कीच त्यांच्या कामाचा अनुभव लाभणार आहे. लखन सोनवणे हे या भागातील नागरिकांना नक्कीच आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून न्याय मिळवून देतील असा विश्वास ड. निलेशजी घाणेकर यांनी व्यक्त करून ड. लखन सोनवणे यांच्या व्यवसायाला शुभेच्छा दिल्या.यावेळी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी म्हटले की, केज येथे वकील क्षेत्रामध्ये काम करत असताना ड. लखन सोनवणे यांनी माणसातला माणूस शोधण्याचे काम करावे. नक्कीच तुम्ही माणसांमधील माणूस शोधला तर आपण आपल्या व्यवसायामध्ये लवकरच नावलौकिक होणार व आपला हा व्यवसाय उंच शिखरापर्यंत लवकरच पोहोचेल. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, गेल्या सहा महिन्यापासून ड. लखन सोनवणे यांनी केज येथील जिल्हा सत्र न्यायालयात प्रॅक्टिस करण्याचे काम चालू केले तेव्हापासून बरीचशी प्रकरणे चांगल्या प्रकारे हाताळली आहेत याची चर्चा आमच्यासारख्या पर्यंत पोहोचली आहे त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. वकील क्षेत्रात देखील तज्ञ वकिली हे आमच्या केजला लाभले त्यामुळे आम्हाला आमच्या अडचणी सोडवणे साठी सोयीचे झाले आहे. आपण आपल्या व्यवसायात असेच कार्य करत राहावे आम्ही आपल्या सोबत कायम आहोत अशी ग्वाही इनामदार यांनी दिली.अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना नगराध्यक्ष सीताताई बनसोड म्हणाले की, छत्रपती संभाजी नगर सारख्या मोठ्या शहरांमध्ये प्रॅक्टिस करून आपल्या गावाच्या ठिकाणी येऊन वकील या क्षेत्रातील व्यवसाय करण्याची ड. लखन सोनवणे यांनी जिद्द बाळगले त्याबद्दल त्यांचे नगराध्यक्षा बनसोड यांनी कौतुक केले. पुढे बोलताना नगराध्यक्षा बनसोड म्हणाले की, ड. लखन सोनवणे यांच्या कामाचा अनुभव मी जवळून पाहिला आहे त्यांचे वकील या क्षेत्रात उत्कृष्ट असे काम आहे त्यामुळे ड. लखन सोनवणे हे फक्त वकील म्हणून काम थोड्या दिवस करतील त्यांची जिद्द पाहून असे मला वाटते की, भविष्यात लवकरच ते जज होतील. आमच्या वकील साहेबांना मला यापुढे वकील म्हणून पाहण्यापेक्षा त्यांना पुढील काळात जज म्हणून पाहिजे आहे.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार अशोक सोनवणे, विजय सोनवणे, पत्रकार वसंत सोनवणे, पत्रकार तात्या गवळी, पत्रकार महादेव काळे, रवींद्र मेटे, ज्योतीराम सावंत, विकास सोनवणे यांच्यासह सामाजिक, राजकीय,शैक्षणिक, संप्रदाय, वैद्यकीय, पत्रकार, वकील क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनवणे परिवार व ड. लखन सोनवणे यांचे सहकारी व मित्रपरिवार यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाची सांगता शेवटी अल्पोपहारणे करण्यात आली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संत ज्ञानेश्वर गुरुकुलचे सचिव दादासाहेब कराड यांनी केले तर उपस्थितांचे आभार अशोक सोनवणे यांनी मानले. या कार्यक्रमास केज तालुक्यातील व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून ड. लखन सोनवणे यांच्या व्यवसायासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.


हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.